## संपादकीय

### विधानसभा मतदारांसाठी सोयी-सुविधा आवश्यक

महाराष्ट्र विधानसभेची मुदत येत्या २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्यामुळे, पाच वर्षांनी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा कधी होणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीकडून विधानसभेची जोरदार तयारी होताना दिसत आहे. भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष असले तरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने जनतेसमोर जाण्याची तयारी केली आहे. मात्र काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (उबाठा गटा) मध्ये अद्याप मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरलेला नाही. मुख्यमंत्री पदावरून महाविकास आघाडीमध्ये धुसफूस आहे. दुसऱ्या बाजूला "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला राज्यातील महिलांकडून जो चांगला प्रतिसाद मिळत आहे, त्यामुळे महायुतीला विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी कोणतीही भीती वाटत नाही. त्यात केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहे. या दोन दिवसांत केंद्रीय आयोगाकडून राज्यातील विविध राजकीय पक्ष, पोलीस तसेच जिल्हा प्रशासनासोबत बैठकाचा सिलसिला सुरू आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसेच निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू हे स्वत: आढावा घेत असल्याने राज्यातील सनदी अधिकारी आणि पोलीस प्रशासनांना कोणत्या सूचना देतात याकडे लक्ष लागले आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या नेतृत्वाखालील राज्य निवडणूक आयोगाला सतर्क झाला आहे. पोलीस प्रशासनासोबत झालेल्या बैठकीत पोलीस व्हॅन आणि ॲम्बुलन्सच्या वाहनांच्या आडून रोख रकमेची ने–आण केली जाते, याकडे काळजीपूर्वक तपासणी करावी, अशा सूचना पोलिसांना देण्यात आल्या. सर्व नेत्यांचे/स्टार प्रचारकांचे हेलिकॉप्टर प्रोटोकॉलनुसार तपासले जायला हवे. कोणी कितीही मोठा नेता असला तरी सर्वांना समान वागणूक दिली पाहिजे, असेही मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी सांगितले आहे. तसेच, सर्व बँकांनी नियुक्त केलेल्या वाहनांमध्ये केवळ नियुक्त वेळेत पैसे हस्तांतरित करावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. इतर राज्यातून अमली पदार्थ साठा निवडणूक काळात येतो, असे प्रकार याआधी घडले असल्याने पोलिसांनी करडी नजर ठेवावी लागणार आहे. विशेषत: सोलापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्गावर तपासणी आणि सतर्कता वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. इतर राज्यांमधून रेल्वे मार्गाने ड्रग्जचा साठा येऊ शकतो असा संशय असल्याने रेल्वे पोलीस दलाशी समन्वय ठेवून नाशिक आणि कल्याण रेल्वे स्थानकावर चेकिंग वाढवा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नाशिक, पुणे आणि मुंबई विमानतळावर तपासणी कडक होणार आहे.

निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांनी राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यात राजकीय पक्षांचा मतदारांची गाऱ्हाणी मांडण्यात भर होता हे ऐकून बरं वाटले. शेवटी मतदार राजा हाच मतदानाच्या दिवशी महत्त्वाचा घटक असला तरी, त्याला अनेक गैरसोयीला सामोर जावे लागल्याच्या तक्रारी लोकसभा निवडणुकीत पाहावयास मिळाल्या. अनेक निवडणूक केंद्राच्या बाहेर छप्पर नसल्याने रांगेत तासनतास उभे राहिलेल्या मतदारांना उन्हांचे चटके सहन करावे लागले. अनेक ठिकाणी ईव्हीएम धीम्या गतीने चालत असल्याने, मतदारांना लांबलचक रांगेत ताटकळत राहावे लागले होते.

आगामी विधानसभेच्या निवडणुका राज्यभरात एकाच टप्प्यात घेण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. त्यात शिवसेनेच्या शिष्टमंडळाने माजी खासदार राहुल नार्वेकर यांच्या नेतृत्वाखाली आयोगाला काही मागण्या दिल्या आहेत, त्या स्वागतार्ह आहेत. लोकसभा निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्रांवरील अपुऱ्या सुविधेमुळे मतदारांनी नाराजी व्यक्त केली होती. यंदा विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आणि मतदारांना कोणत्याही असुविधेविना विनाव्यत्याय मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी निवडणूक आयोगाने सर्व आवश्यक सुविधांनी युक्त अशी सुसज्ज मतदान केंद्रे उभारावी, ज्येष्ठ नागरिक मतदारांची वयोमर्यादा ८५ वरून पुन्हा ८० वर्षे करावी. जेणेकरून ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदान करण्याची सुविधा मिळू शकेल, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने आयोगाकडे करण्यात आली.

तसेच भाजपा आमदार ॲड. आशीष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे काही सूचना मांडल्या. मतदानाचा दिवस सलग सुट्ट्यांच्या दिवशीचा असू नये. जर नोव्हेंबरमध्ये निवडणूक होणार असेल तर तेव्हा ही लोकसभेप्रमाणे वातावरणात गर्मी असू शकते. त्यामुळे रांगेत उभे राहणाऱ्या मतदारांना उभे राहण्यासाठी शेड, पंखे, पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. मोबाइल व बॅग घेऊन जाण्यास बंदी घालण्यात येते पण त्यामुळे काही जण मतदार केंद्रावर जाणे टाळतात. त्यामुळे बॅग ठेवण्यासाठी टोकन सुविधा असावी. दीड हजार मतदारामागे एक बुथ अशी रचना असते, त्यामुळे मतदान केंद्रावर गर्दी होते. रांगा लागतात. त्यापेक्षा कमी मतदार संख्येचा बुथ असावा, अशा मागण्या भाजपाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. निवडणूक आयोगाकडे गाऱ्हाणी मांडताना, मतदारांना भेडसावणाऱ्या समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला, ही राजकीय पक्षाची भूमिका खरोखरच मतदारांना आपलेसे करणारी ठरेल.

# हलका धान कापणीला आला,मात्र हमी भाव केंद्राचा शासन निर्णय मंत्रालयातच अडकला



**गोंदिया:–** खरीप हंगामातील हलक्या जातीचे धान आता तोडणीच्या मार्गावर आले असून दिवाळीपुर्वी हे धान शेतकरी मळणी करुन विकण्याच्या तयारीला लागणार असल्याचे चित्र धान उत्पादक पुर्व विदर्भातील जिल्ह्यात आहे.नेहमी हलक्या स्वरुपाचे धान मळणी होऊन विक्रीकरीता शेतकर्याकडे तयार असते परंतु शासकीय धान खरेदीची हमीभाव केंद्र नियमाप्रमाणे सुरु होत नसल्याने नाईलाजास्तव सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळे व्यापारी वर्गाला पडक्या दरात विकायची वेळ येते.तीच परिस्थिती यावर्षी सुध्दा असून अद्यापही शासनाने हमीभाव केंद्र सुरु करण्यासंदर्भात कुठलाच निर्णय घेतलेला नाही.

वास्तविक धान खरेदी १ ऑक्टोंबर रोजी आणि रब्बी हंगामातील धान खरेदी १ मे रोजी सुरु करण्याचे शासकीय धोरण आहे. त्यामुळे नियोजित तारखांप्रमाणेच आधारभूत केंद्र सुरु होणे आवश्यक आहे.मात्र धान खरेदी प्रकिया संदर्भातील शासन निर्णय उशिरा निर्गमित झाल्याने शेतकर्यांची केंद्रावर नोंदणी होण्यास उशीर होतो, त्यामुळे धानाची विक्री सुध्दा होत नाही. त्यातच जिल्हास्तरावरुन अद्यापही धान खरेदी केंद्राना पालकमंत्र्यांनी मंजुरीच दिली नसल्याचे समोर आले असून येत्या १३ ऑक्टोबरला आचारसंहिता लागू होताच हमीभाव केंद्र हे आचारसंहितेत तर अडकणार नाही ना अशा प्रश्न निर्माण झालेला आहे.

किमान आधारभूत किमतीप्रमाणे धानाची खरेदी केंद्रे सुरु करण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने शासन निर्णय निघाल्याशिवाय जिल्हास्तरावर पणन विभाग खरेदी केंद्राची यादीच तयार करु शकत नसल्याने यावर्षी काय होणार याकडे लक्ष लागले आहे.केंद्रे आजच्या घडीला सुरू होणे अपेक्षित असताना एकही केंद्र आजवर सुरू करण्यात आले नाही. त्यामुळे हमीभावाची गॅरंटी राहिली नसल्याने गरजू शेतकरी आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी कमी दरात व्यापाऱ्यांना धानाची विक्री करण्याची वेळ येणार आहे.

शेतकरी दोन वाणांच्या धानाचे उत्पादन घेतो. बारीक धानाला दरवर्षी किमान आधारभूत किमतीपेक्षा अधिक दर मिळत असल्याने या धानाच्या विक्रीची फारशी समस्या नाही. मोठ्या धानाचे दर दरवर्षी किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी असतात. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकार विदर्भ मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान खरेदी केंद्रे सुरू करते.

## ओबीसी नेत्यानेच केला गोंदिया विधानसभा मतदारसंघात ओबीसी बहुजनांचा घात

**गोंदिया :** राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. त्यातच गोंदिया जिल्ह्यातील चारही विधानसभा क्षेत्रातील उमेदवारांना घेवून रस्सीखेच सुरू झाली आहे. मात्र सर्वाधिक चर्चेत आला गोंदिया विधानसभा क्षेत्र. काँग्रेस व भाजप पक्षात २०१९ च्या निवडणुकीत जे बदल झाले, त्या बदलानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेस व भाजपला बहुजन ओबीसी समाजातील नेत्यांनी सांभाळले.

मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्याच काँग्रेस व भाजपने बहुजन नेतृत्वाला डावलून अल्पसंख्यक व आर्थिक दृष्ट्या बळकट असलेल्या नेत्यांवरच डाव खेळत असल्याने दोन्ही पक्षातील बहुजन नेत्यांचा हिरमोळच पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यासह नागपूर निवासी ओबीसी नेत्याने केल्याचे चित्र या विधानसभा क्षेत्रात दिसून येत आहे. परिणामी बहुजन ओबीसींचा काय कसूर? असा सवाल करीत २०१९ मध्ये जी स्थिती उफाडून आली होती,तिच स्थिती बहुजन नेतृत्वाकडूनही उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.विशेष म्हणजे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सुध्दा भाजपने गोंदिया मतदारसंघातील ओबीसी बहुजन नेत्यांना डावलून विनोद अग्रवाल यांना संधी दिली,तेव्हा मात्र २०१९ मध्ये अपक्ष निवडणूक लढतांना मेरा क्या कसूर म्हणणारे २०१४ च्या निवडणूकीला का विसरतात असा प्रश्न पुन्हा भाजपच्या ओबीसी बहुजन नेत्यामध्ये चर्चेत आलेला आहे.तर काहींनी नागपूरातील ओबीसी नेत्यांनी या मतदारसंघातील ओबीसी बहुजनांना संपवण्याची सुपाळी घेत,कंत्राटदार भांडवलदार नेत्यासोंबत हातमिळवणी केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

२०१९ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपने विनोद अग्रवाल यांची उमेदवारी नाकारून काँग्रेसमधून भाजप प्रवेश करणारे गोपालदास अग्रवाल यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविले. तर विनोद अग्रवाल यांनीही मेरा क्या कसूर म्हणून भाजपला ठेंगा दाखवत अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली. यामुळे असली भाजप व नकली भाजपचाहीचा तेढ निर्माण झाला. त्यानंतर याचे परिणाम भाजप व काँग्रेसला या दोन्ही पक्षाला भोगावे लागले.

अशातच यंदाच्या निवडणुकीत अशी परिस्थिती उद्भवणार नाही व दोन्ही पक्ष बहुजन समाजातील नेतृत्वाला संधी देईल, अशी आस होती. त्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाकडून बाजार समितीचे उपसभापती राजकुमार पटले, संचालक राजीव ठकरेले, काँग्रेसचे प्रदेश सचिव अमर वराडे,जितेश राणे यासारख्या युवा बहुजनांनी काँग्रेस पक्षाला जिवंत ठेवले.तसेच पक्षाच्या प्रदेशाध्यक्षापासून इतरांनीही बहुजन ओबीसी उमेदवार राहणार, असे आश्वासन देत कामाला लागण्याचे संदेश दिला.

मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा भाजपतून गोपालदास अग्रवाल यांना आयात करून काँग्रेस पक्षाने बहुजनांच्या स्वप्नांवर पाणी फेरले.तर दुसरीकडे भाजपचे विनोद अग्रवाल हे अपक्ष चाबी संघटनेच्या माध्यमातून कार्यरत राहिले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही भाजपला पराभूत करण्याचे काम केले. अशा कठिण परिस्थितीत गोंदिया विधानसभा क्षेत्रात बहुजन ओबीसी नेत्यांनीच भाजपा वाढविण्याचे काम केले.त्यामुळे जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, जि.प.सभापती संजयसिंह टेंभरे, माजी जि.प. अध्यक्ष नेतराम कटरे,माजी जि.प.अध्यक्ष विजय शिवणकर, डॉ. प्रशांत कटरे,राजेश चतूर,गजेंद्र फुंडे यापैकी कुणीही एक बहुजन भाजपचा उमेदवार राहणार व त्या अनुषंगाने हे बहुजन नेते कामालाही लागले होते. मात्र जी परिस्थिती काँग्रेसने निर्माण केली, तीच परिस्थिती भाजपनेही निर्माण केल्याने विधानसभा क्षेत्रात काँग्रेस व भाजपने बहुजन समाजातील नेतृत्वाला पोरका करण्याचेच काम केले आहे.

परिणामी आमचा काय कसूर म्हणतं २०१९ ची पुनरावृत्ती बहुजन नेतृत्व करणार अशी स्थिती गोंदिया विधानसभा क्षेत्रात निर्माण झाली आहे.

## ग्रामीण व शहरी क्षेत्राच्या विकासासाठी सदैव कटीबद्ध–आ.विजय रहांगडाले



**तिरोडा:–** तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी शासनाकडून नागरी क्षेत्रात १०.०० कोटी व ग्रामीण क्षेत्रातील रस्ते व सामाजिक सभागृह बांधकामाकरिता ६.०० कोटी रुपये मंजूर करवून घेतला असून यापैकी १कोटी १५ लक्ष रुपये विकासकामांचे भूमिपूजन संपन्न झाले. यामध्ये प्रामुख्याने न.प.तिरोडा येथेगिरजाबाई शाळेजवळ सामाजिक सभागृह बांधकाम ३०.०० लक्ष, स्वच्छतागृह बांधकाम १०.०० लक्ष, माजी सैनिक सभागृह येथे सभा गृह बांधकाम ३०.०० लक्ष, सरक्षणभिंत बांधकाम १०.०० लक्ष, बयवाडा येथे सिमेंट रस्ता ५.०० लक्ष, केसलवाडा येथे सभामंडप बांधकाम २०.०० लक्ष, सिल्ली येथे सभामंडप ५.०० लक्ष, सीतेपार येथे सभामंडप बांधकाम ५.०० लक्ष या कामांचा समावेश असून आमदार विजय रहांगडाले याच्या हस्ते भूमिपूजन संपन्न झाले.

यावेळी प्रामुख्याने कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जितेंद्र रहांगडाले, न.प.बांधकाम माजी सभापती अशोक असाटी, जी.प. सदस्या रजनी कुंभरे, चत्रभूज बिसेन, प.स.सदस्य तेजराम चव्हाण, डॉ. चेतलाल भगत, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रविंद्र वहिले, दीपक कुकडे व संबधीत गावातील सरपंच, ग्रा.प.सदस्य व गावकरी उपस्थित होते.

## रतनलाल बघेले वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानीत




**गोंदिया :** कृषि विभागाच्या वतीने सन २०२०, २०२१ व २०२२ या तीन वर्षात कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी व अधिकारी यांचा सत्कार व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन वरळी (मुंबई) येथील एन.एस.सी.आय. डोम येथे २९ सप्टेबर २०२४ रोजी करण्यात आले होते. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे हस्ते लोधीटोला (चुटीया) येथील प्रगतशील शेतकरी रतनलाल गोधनलाल बघेले यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

सेंद्रिय शेतीमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषि मंत्री धनंजय मुंडे, कृषि विभाग सचिव जयश्री भोज, आयुक्त (कृषि) रविंद्र बिनवडे व राज्याचे कृषि विभागाचे संचालक उपस्थित होते. रतनलाल बघेले यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अजित आडसुळे, उपविभागीय कृषि अधिकारी मंगेश वावधने, तालुका कृषि अधिकारी पवन मेश्राम, कृषि अधिकारी मुनेश्वर ठाकुर, कृषि सहाय्यक भावेश दमाहे व आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सुनिल खडसे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

रतनलाल बघेले हे मागील १५ ते २० वर्षापासून लोधीटोला (चुटीया) येथे सेंद्रिय शेती करत आहेत. एकूण १० एकर शेती पैकी ३ एकर शेतात पपई, आंबा हे फळपिके व भाजीपाला पिकामध्ये वांगी, चवळी, मिरची, लवकी, कारले, अळुची पाने, हळद, अद्रक घेतात व उर्वरित क्षेत्रात सेंद्रिय पध्दतीने भात पिकाची लागवड करतात. त्यांनी जिल्ह्यात सर्वात प्रथम सेंद्रिय पपई लागवड केलेली आहे.

रतनलाल बघेले यांना पुर्वी महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी व कृषि मंत्रालय नवी दिल्ली प्रशिक्षणात उत्कृष्ट सहभाग व जिल्ह्यात कृषि विभागामार्फत आयोजित अनेक कार्यक्रमात सहभाग घेतल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आलेले आहेत.

## विद्यमान सरकारनी महीलांना आत्मनिर्भर बनविले:–माजी मंत्री राजकुमार बडोले



**अर्जुनी मोर :** महीला ही सर्व शोधाची जणनी आहे.वर्तमान केंद्र आणी राज्य सरकारनी महीलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध योजना अमलात आणल्या.त्याचा फायदा महिला भगिणिंना मोठ्या प्रमाणात झाला आहे. एस.टी.बसमधे सवलत,उमेद व बचतगटाच्या माध्यमातुन महीलांचा औद्योगिक विकास, लघुउद्योगासाठी मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, या अनेक योजनांच्या माध्यमातुन महीलांचा सर्वांगीण विकास ,अशा अनेक योजना विद्यमान सरकारनी दिल्या आहेत.

यामुळे केंद्र व राज्यशासनाच्या विविध योजनांनी महिलांना आत्मनिर्भर बनविले त्यामुळे या योजना अवीरत सुरु ठेवण्यासाठी आपन महिलांनी भाजपा सरकारच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टी अर्जुनी मोर. विधानसभेच्या वतीने बोंडगावदेवी व गोठणगांव जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत चान्ना/बाकटी, व गोठणगांव येथे आयोजित महीला मेळाव्यानिमीत्त आयोजीत कार्यक्रमात उदघाटक म्हणुन माजी मंत्री बडोले बोलत होते.अध्यक्षस्थानी राष्ट्रीय संपर्क प्रमुख विश्वमांगल्य सभेच्या सौ.शुभांगी मेंढे होत्या.अतिथी म्हणुन जि.प सदस्य लायकराम भेंडारकर, चामेश्वर गहाणे, सीताबाई रहांगडाले, कृऊबा संचालिका शारदाताई बडोले, जि.प.सदस्य कविता रंगारी,उपसभापती होमराज पुस्तोळे, भाजपा तालुका अध्यक्ष विजय कापगते, लक्ष्मीकांत धानगाये, जि.प.सदस्या पोर्णिमा ढेंगे, जयश्री देशमुख, निशा तोडासे, पं.स सदस्य नुतन सोनवाने, संदीप कापगते, कुंदाबाई लोगडे, लैलेश शिवनकर, व्यंकट खोब्रागडे, प्रितीताई कतलाम ,प्रकाश गहाणे,भोजु लोगडे, गिताताई ब्राम्हणकर, ममता भैय्या,मंजुषा तरोणे, मिना शहारे, आशा नाकाडे,रत्नाकर बोरकर, राधेश्याम झोळे, राजहंस ढोक, वामण ब्राम्हणकर, दिपंकर उके,अन्य मान्यवरांसह भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शारदाताई बडोले यांनी ही अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी राजकुमार बडोले यांनी महायुती सरकारच्या दमदार निर्णयाची माहीती देताना मातृशक्ती करीता खासदार, आमदार बनण्यासाठी आरक्षण, एस.टी.बसमधे अर्ध्या टिकीटीवर प्रवास,१२ वी नंतर मुलींच्या उच्च शिक्षणासाठी राज्य सरकारची हमी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अशा असंख्य योजनेच्या माध्यमातुन महीलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाने केलेल्या धाडसी निर्णयाची माहीती दिली.महीला मेळावे माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या आगामी होणा–या विधानसभा निवडणुकीत विजयाची नांदी असणारे ठरले.

## गोंदिया विधानसभेत विजयी पताका रोवू – मा.आमदार राजेन्द्र जैन

**गोंदिया**:राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गोंदिया तालुका पांढराबोडी जि.प., क्षेत्रातील पक्ष पदाधिकारी व कार्यकर्तांची संघटनात्मक बैठक रिताराम लील्हारे यांच्या निवासस्थानी माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमूख उपस्थितीत संपन्न झाली.खासदार प्रफुल पटेल यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बोनस देण्याचे काम केले आहे यावर्षी सुध्दा धानाला २५ हजार बोनस देण्याबाबत सरकारशी चर्चा केली आहे. महायुति सरकारने अनेक लोककल्याणकारी योजना लागू केल्या आहेत. लाडली बहन योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असून महिलांमध्ये उत्साह आहे.

अजितदादा पवार यांनी आपला वादा निभावलं असून ऑक्टोबर व नोहेंबर महिन्याचे पैसे खात्यात येणे सूरू झाले आहे. सिंचन, आरोग्य, शिक्षण क्षेत्र, शेतकरी व शेतमजूर यांच्या विकासासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत प्रफ़ुल पटेल यांच्या निर्देशानुसार गोंदिया विधानसभा क्षेत्रात उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांना घ्यायची आहे असे प्रतिपादन माजी आमदार राजेन्द्र जैन यांनी केले.

बैठकीला सर्वश्री राजेंद्रजी जैन, गणेश बरडे, छोटूभाऊ पटले, चंदन गजभिये, हरिश्चंद्र हरीणखेडे, सुखदेव मेश्राम, भिकराज चौधरी, देवेंद्र गौतम सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पहिल्या प्रयत्नात प्रणया झाली उपजिल्हाधिकारी

### आमगाव तालुक्याचे नाव केले गौरवान्वित, अभ्यासात ठेवले सातत्य

**गोंदिया:** ठरविलेले ध्येय गाठण्यासाठी जिद्द आणि चिकाटीने प्रयत्न केले तर निश्चितच ध्येयापर्यंत पोहोचता येते. अशीच जिद्द आणि अभ्यासात सातत्य ठेवून आमगाव तालुक्यातील सुरकुडा येथील तरुणीने पहिल्या प्रयत्नात स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण उपजिल्हाधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले आहे. प्रणया सोमकांत भालेकर असे पहिल्याच प्रयत्नात उपजिल्हाधिकारी झालेल्या तरुणीचे नाव आहे.



प्रणया भालेकर ही आमगाव तालुक्यातील सुरकुडा येथील रहिवासी आहे. तिचे वडील सोमकांत भालेकर याच तालुक्यातील कातुर्ली येथील शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. प्रणया ही सुरुवातीपासूनच अभ्यसात हुशार आहे. तिने स्पर्धा परीक्षेचा अभ्यस करुन मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्या दिशेने प्रयत्न करण्यास सुरुवात केली. नियमित अभ्यास, जिद्द चिकाी कायम ठेवीत तिने स्वत:च्या परिश्रमाच्या बळावर हे यश प्राप्त केले आहे. प्रणयाला तिच्या आईवडीलांचे मार्गदर्शन आणि वेळोवेळी प्रेरणा मिळाली. त्यामुळे याची तिला तिचे ध्येय गाठताना मोठी मदत झाली.

विशेष म्हणजे तिने पहिल्याचा प्रयत्नात उपजिल्हाधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण केली. तिने प्राप्त केलेल्या यशाने केवळ आमगाव तालुकाच नव्हे तर गोंदिया जिल्ह्याचा सुद्धा गौरव झाला आहे. सुरकुडा सारख्या छोट्या गावातील तरुणीने घेतलेल्या या गगन भरारीचे तालुकावासीयांनाी कौतुक केले. तर आपल्या मुलीने जिद्द चिकाची आणि अभ्यासाच्या बळावर मिळविलेल्या यशाचे कौतुक असल्याचे प्रणयाचे वडील सोमकांत भालेकर सांगतात.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये १३ हजार १८४ प्रकरणांचा निपटारा

**गोंदिया:–** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले समोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरीता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई याचे निर्देशान्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष ए.टी.वानखेडे तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एन.के.वाळके यांचे मार्गदर्शनाखाली २८ सप्टेबर २०२४ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये सर्वच प्रकारच्या तडजोड पात्र न्याय प्रविष्ठ व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरीता तसेच विद्युत व बँक लोकोपयोगी पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष ए.टी.वानखेडे यांचे अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा न्यायाधीश–२ एम.टी.असीम, जिल्हा न्यायाधीश–३ एन.टी.खोसे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर डी.व्ही.हरणे, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस.आर. मोकाशी, मुख्य न्यायदंडाधिकारी ए.व्ही. कुलकर्णी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एन.के.वाळके, जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. आर.ओ.कटरे यांचे प्रमुख उपस्थितीत लोक न्यायालयाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष ए.टी.वानखेडे यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष ए.टी.वानखेडे यांनी लोक अदालतीचे फायदे व महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

जिल्ह्यातील न्यायालयात प्रलंबित दिवाणी १३३३ प्रकरणांपैकी ७२ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये १ कोटी ६२ लाख ३ हजार ८२० रुपये वसुलींचे प्रकरणे निकाली निघाले. न्यायालयात प्रलंबित ३१५७ फौजदारी प्रकरणांपैकी १००२ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये २ कोटी १५ लाख ६४ हजार ६४३ रुपये वसुलींचे प्रकरणे निकाली निघाली.

तसेच लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेले पुर्वन्यायप्रविष्ठ ४६८३९ प्रकरणांपैकी २२२१० प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये २ कोटी ६१ लाख ५९ हजार १०९ रुपयांची वसुली झाली. एकूण ५१३२९ ठेवलेल्या प्रकरणांपैकी २३२८४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामधून ६ कोटी ३९ लाख २७ हजार ५७२ रुपये वसुली झाली.

त्याचप्रमाणे स्पेशल ड्राईव्ह अंतर्गत जिल्ह्यातील न्यायालयामध्ये ५२० फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी ४५८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामुळे पक्षकार व इतकरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. यामुळे ब?याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे ८० वर्ष वयोमान असलेले सोविंदा मेंढे व लिखीराम दाते यांच्यातील आठ



वर्ष जुन्या नियमीत दिवाणी दाव्यात समझोता करण्यात आला. तसेच आयशा कुरेशी व जुनेद कुरेशी यांच्यात घटस्फोट होऊन सुध्दा या लोकअदालतीत सामंजस्याने आपसी समझोता झाल्यामुळे एकत्र जीवन जगण्याचे निश्चित केले. तसेच विद्युत, पाणी, टेलिफोन, बँक रिकव्हरी यांचे पुर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबंधित विभागाला जमा केली त्यांची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबंधित विभाग व थकभागीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याकरीता जिल्हा न्यायाधीश–२ एम.टी.असीम, जिल्हा न्यायाधीश–२ एन.डी.खोसे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर डी.व्ही. हरणे, मुख्य न्यायदंडाधिकारी ए.व्ही. कुलकर्णी, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस.आर.मोकाशी, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी.एन.ढाने, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वाय.के. राऊत, तिसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एम.बी. कुडते, चौथे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वाय.जे. तांबोळी, सहावे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डॉ. एस.व्ही. आव्हाड यांनी व जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. आर.ओ.कटरे, तसेच पॅनलवरील वकील ॲड. विवेक धुर्वे, ॲड. रजनी दशरिया, ॲड. अलका बोकडे, ॲड. सुनिता चौधरी, ॲड. रोशनी पटले यांनी सहकार्य केले.

लोकअदालतीचे यशस्वी आयोजनाकरीता प्रबंधक पी.पी. पांडे, अधीक्षक पी.बी.अनकर व एम.पी.पटले, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील ए.एम. गजापुरे, पी.एन. गजभिये, सुशिल गेडाम, के.एस.चौरे, एल.ए.दर्वे, प्रीती जेंगठे तसेच बी.डब्ल्यू. पारधी, रोहित मेंढे, रायभान मेश्राम, किरणकुमार पालेवार, नितेश गायधने, पॅरा लिगल व्हालंटीअर्स तसेच इतर न्यायालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# पर्यटन विकासासाठी कटीबद्ध-आ. विजय रहांगडाले

## बोदलकसा जलाशयात पर्यटकांकरीता बोटींगची सुविधा सुरु

**गोंदिया:-** तिरोडा गोरेगाव विधासभा क्षेत्रांतर्गत तिरोडा तालुक्यात बोदलकसा येथे इंग्रजकालीन तलाव असून सदर तलाव नागझिरा पर्यटन क्षेत्राशी लागून असल्यामुळे या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक येतात.पर्यटकांची जलाशयात बोटिंग सुरु करण्यात यावी अशी अनेक दिवसाची मागणी होती,त्या मागणीला सकारात्मक घेत आमदार विजय रहागंडाले यांनी १५ कोटीच्या पर्यटन निधीतून बोटींग उपलब्ध करुन देत या सेवेचा आज ६ ऑक्टोंबरला शुभारंभ केला.

बोदलकसा पर्यटनस्थळाच्या विकासाच्या अनुषंगाने सन २०१६ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे विश्रामगृह बांधकामाकरिता २.५० कोटी मंजूर करुन भव्य बांधकाम पूर्ण झाले आहे.या तलावामध्ये बोटिंगची सुविधा उपलब्ध करण्याबाबत मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे बोदलकसा जलाशयात बोटिंगची सुविधा शासनातर्फे मंजूर करण्यात आली असून सदर बोटिंगचे उदघाटन आमदार यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रामुख्याने कृउबास सभापती जितेंद्र रहांगडाले, सरपंच चैतलाल पटले, जि.प.सदस्य पवन पटले, माधुरी रहांगडाले, रजनी कुंभरे, जिल्हा महामंत्री मदन पटले, कृउबास संचालक मिलिंद कुंभरे, सोशल मिडिया प्रमुख संजय पारधी,किसान आघाडी तालुकाध्यक्ष नितीन पारधी , उमेश पटले,वनप्रीक्षेत्राधिकारी आर. जे. मून, गोरेगाव तहसिलदार व मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.



## आमगाव न.पं.चा मार्ग होणार मोकळा

### सर्वोच्च न्यायालयातून याचिका घेणार मागे, शहरवासीयांमध्ये पसरला आनंद




**गोंदिया:** आमगाव नगरपरिषद की नगर पंचायत? या संदर्भात गत ७ ते ८ वर्षापासून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मात्र आता राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २८ नोव्हेंबर २०१७ रोजी दिलेल्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष रजा याचिका मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हे प्रकरण लवकरच मार्गी लागण्याची शक्यता बळावली आहे.

जिल्ह्यातील आमगाव नगरपरिषदेची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने २ ऑगस्ट २०१७ रोजी अधिसूचना जारी केली होती. ज्याला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले. ती २८ नोव्हेंबर २०१७ रोजी उच्च न्यायालयाने रद्द केली. त्याविरोधात महाराष्ट्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयात विशेष रजा याचिका दाखल केली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने २८ नोव्हेंबर २०१७ रोजी स्थगिती दिली होती. त्यानंतर आजतागायत आमगाव येथे नगरपरिषदेचा कारभार सुरु असून निवडणुकीअभावी प्रशासकराज सुरु आहे. शुक्रवारी (दि.४) राज्य सरकारचे याचिका मागे घेण्यासाठी विशेष परवानगी दिल्याची बातमी सोशल मिडीयावर व्हायरल झाली. त्यानंतर आता आमगावमध्ये पुन्हा नगरपंचात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आमगावमध्ये ही बातमी व्हायरल झाल्यानंतर नगरपरिषदेऐवजी नगरपंचायत स्थापन व्हावी, अशी मागणी करणाऱ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला.

**राज्य सरकारला याचिका मागे घ्याचीच होती तर यापुर्वी का घेतली नाही. या काळात प्रशासकराज असल्यामुळे आमगाव, बनगाव, रिसामासह एकूण ८ गावांतील नागरिकांना त्रास सहन करावा लागला. तसेच विकासाच्या योजना रखडल्या. ग्रामीण भागासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनादेखील राबविता आल्या नाही. राज्य शासनाने याचिका परत घेण्याचा निर्णय घेतला तो योग्य आहे. परंतु तो उशिरा घेतला.**

**सहसराम कोरोटे, आमदार**

## निक्षय मित्र बनवून क्षयरुग्णांना पोषण आहार देण्यासाठी नागरिकांनी समोर यावे- जिल्हाधिकारी प्रजित नायर

**गोंदिया :-** प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षय मित्रांची नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सर्व क्षयरुग्णांना पोषण आहार देण्यासाठी विविध क्षेत्रातील खाजगी संस्था, लॉयन्स क्लब, रोटरी क्लब व इतर सामाजिक संस्था यांच्यामार्फत पोषण आहार पुरविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात १ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी प्रजित नायर व मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टीबी फ्फोरम व जिल्हा को-मॉर्बीडीटी सभा संपन्न झाली. सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार, डॉ.वेदप्रकाश चौरागडे, डॉ.देव चांदेवार, डॉ.रोशन राऊत, डॉ.सचिन चौधरी उपस्थित होते.

प्रारंभी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी टीबी फोरम व जिल्हा को-मॉर्बीडीटीचे महत्व व कार्य यांचे सादरीकरणाद्वारे माहिती दिली. तसेच राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत येणारे सर्व निर्देशांकांची माहिती देण्यात आली.

सभेमध्ये जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी, खाजगी वैद्यकीय व्यावसायीक व तालुका आरोग्य अधिकारी यांना टीबी नोटीफ्फिकेशन व इतर सर्व निर्देशांकात वाढ होण्यासाठी सांगितले.



उपचार घेणाऱ्या सर्व क्षयरुग्णांना निक्षय पोषण योजनेचा लाभ मिळण्याकरीता प्रत्येक क्षयरुग्णांची नोंद निक्षय प्रणालीमध्ये करणे अनिवार्य आहे. त्याकरिता क्षयरुग्णांची नोंद करण्यासाठी (नोटीफिकेशन) करीता ५०० रुपये अनुदान देण्यात येते. तसेच क्षयरुणाच्या उपचाराअंती आउटकमची नोंद केल्यानंतर ५०० रुपये अनुदान देण्यात येते. यासाठी वेळेवर क्षयरुग्णांची नोंद निक्षय पोर्टलवर करणे अनिवार्य आहे. तरी सर्व क्षयरुग्ण निदान करणाऱ्या व क्षयरुग्णास उपचार देणाऱ्या आरोग्य संस्थांनी आपल्या संस्थेचे नाव निक्षय प्रणालीमध्ये नोंदवून क्षयरुग्णांची नोंदणी करावी व बँक खात्याबद्दल माहिती घेवून निक्षय पोषण योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करावे. सर्व क्षयरोग संबंधिच्या प्रयोगशाळा तपासण्या, एक्स-रे तसेच संपूर्ण कालावधीचा उपचार हा शासकीय आरोग्य संस्था तसेच शासकीय प्रयोगशाळांमध्ये विनामूल्य केला जातो अशी माहिती सभेत देण्यात आली.

---

### ग्रामपंचायत कार्यालय कवलेवाडा
### पंचायत समिती गोरेगाव,जि.प.गोंदिया

दिनांक-०७/१०/२०२४

ग्रामपंचायत कवलेवाडा ता.गोरेगाव, जि.गोंदिया येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाचा विकास करणे योजनेतून खालील कामांची निविदा ऑनलाईन/ऑफलाईन मोहोरबंद लिफाफ्यात मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | ग्रा.पं.कवलेवाडा वडटोली ते महेंद्र उके यांच्या घरापर्यंत सिमेंट क्रांक्रीट रस्ता बांधकाम | ५ लक्ष |

निविदा प्रसिद्धी व दाखल दिनांक-०७/१०/२०२४

निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक-१४/१०/२०२४ दुपारी २.०० वाजेपर्यंत

निविदा उघडण्याचा दिनांक-१४/१०/२०२४ दुपारी ३.०० वाजता.

यासंदर्भात विस्तृत माहिती ग्रामपंचातीच्या नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यात आली असून अटी व शर्ती लागू राहतील. काही कारणास्तव निविदा रद्द वा पुढे ढकलण्याचा करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.

**सरपंच** ग्रामपंचायत कवलेवाडा

**ग्रामपंचायत अधिकारी** ग्रामपंचायत कवलेवाडा

---

### कार्यालय कार्यकारी अभियंता
### सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ गोंदिया
### कार्या.दुरध्वनी क्रमांक ०७१८२-२५००६४

office e-mail :-egsgondia.ee@mahapwd.gov.in
website :-www.mahapwd.gov.in

जावक क्र.:-५३२९ /नि.लि./२०२४ दिनांक :- ०३/१०/२०२४

**ई-निविदा सुचना क्र.२० (२०२४-२५)**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ गोंदिया हे महाराष्ट्र शासनाचे सां.बां. विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अ नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यात निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत लक्षात |
|---|---|---|
| १ | गोंदिया जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१, गोंदिया अंतर्गत आमगांव गोरेगांव, तिरोडा व गोंदिया तालुक्यातील सर्व शासकीय इमारत परिसरात व रस्त्याचे बाजूला वृक्षारोपण चे कामे करणे. | रू.२६७.१६ |

१) ई-निविदा उपलब्ध कालावधी: As per e-tender Schedule uploades on e-portal ई-निविदा उघडणे: ऑनलाईन नमुद केल्यानुसार वेळापत्रक रक्कम स्थळ इ.लागू व अंतिम राहील. खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. २.इतर अटी व शर्ती ई-निविदा नमून्यामध्ये उपलब्ध असून त्यानुसार निविदा सादर करावी. कोणतेही किंवा सर्व निविदा कोणतीही कारण नसांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आलेले आहे. ३) सदर निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईटवरच प्रकाशित केल्या जाईल. तसेच निविदाधारकांनी बिड लॉक झाल्यानंतर ७२ तासाचे आत निविदे संबंधित कागदपत्रांची (Hard Copy) (Technical Envelope) सिलबंद लिफाफ्यामध्ये निम्न स्वाक्षरीकारांचे कार्यालयात सादर करावे. ४) कार्यकारी अभियंता, सां.बा.विभाग क्र.१ गोंदिया कार्यालयातील सुचना फलक.

**(एन.टी.लभाने)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ गोंदिया**

---

### महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.२ गोंदिया
### (दुरध्वनी क्र.०७१८२-२५००८४)
### ई-निविदा सूचना क्रमांक २४/२०२४-२०२५

जावक क्र.:-३८९९ /नि.लि./२०२४-२५ दिनांक :- ०३/१०/२०२४

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, क्रं.२ गोंदिया हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक खात्याकडून खालील कामाकरीता विहीत ब-१ (टक्केवारी पद्धतीने) नमून्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथना नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रं.२ गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.लक्षात) | इसारा रक्कम (रू.लक्षात) | ई-निविदा फार्म किंमत (नापरतावा) |
|---|---|---|---|---|
| १ | सा.बा.विभाग क्रं.२ अंतर्गत विविध रस्त्याचे दुतर्फा वृक्ष लागवड करणे, (अर्जुनी मोर सडक अर्जुनी मोर सडक अर्जुनी सालेकसा देवरी (उपविभागामध्ये) | ७७८.१० | ३.८९ | ३५४०.०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी:** per e-tender Schedule uploades on e-portal

**ई-निविदा उघडणे:** ऑनलाईन नमुद केल्यानुसार वेळापत्रक रक्कम स्थळ इ.लागू व अंतिम राहील.

**टीप :-**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. १. http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. २. कार्यकारी अभियंता सां.बा. विभाग क्रं.२ गोंदिया कार्यालयातील सुचना फलक. ३. सदर निविदा सुचनेतील कामासंबंधित कोणताही बदल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचननेतील कामासंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईटवरच प्रकाशित केल्या जाईल.

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.२ गोंदिया**







# अर्जुनी मोरगाव मतदारसंघाच्या विकासासाठी झटणारे संयमी, सुसंस्कृत व्यक्तीमत्व




# इंजि.यशवंत सोपान गणवीर




समाजकाणासह राजकारणात अत्यंत कमी वेळात आपला आदर्श ठसा उमटविणारे, मृदूभाषी, संघर्षशील आणि संयमी व्यक्तीमत्वत्वाचे धनी इंजि. यशवंत सोपान गणवीर यांनी आपली अर्जुनी मोरगाव विधानसभ क्षेत्रातसह जिल्ह्यात एक वेग़ळी ओळख करुन घेतली आहे. राजकारणातील अति प्रज्ञावंत, सुसंस्कृत आणि प्रामणिक कर्तव्य बजावणारे म्हणून इंजि. यशवंत गणवीर यांना ओळखले जाते. पक्षश्रेष्ठी खा. प्रफुल पटेल, माजी आमदार राजेंद्र जैन यांनी सोपविलेली जबाबदारी गेल्या अडीच वर्षापासून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद भुषवित ते प्रामाणिकपणे कार्य पार पाडत आहेत. त्यामुळे त्यांची लोकमान्य लोकप्रतिनिधी म्हणून क्षेत्रात त्यांची गणना होत आहे. असे असले तरी आपल्या स्वभावगुणातून आपण मोठे राजकारणी नाही. किंबहुना राजकारण हा आपला पिंड नाही, असा परिचय देत ते जनसेवा करीत आहेत. जो माणूस येतो त्याला मदत मिळाली पाहिजे. त्याच्या अपेक्षा पूर्ण व्हायला पाहिजेत. ही भुमिका स्विकारुन ते अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात काम करीत आहेत. त्यामुळे लोकमान्य जनसेवक ठरलेले इंजि. यशवंत गणवीर हे अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील जनतेसाठी आशेचे किरण ठरले आहेत.

## संघर्षशील जीवन प्रवास

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील अत्यंत छोट्याशा प्रतापगड गावात गरीब कुटुंबामध्ये इंजि. यशवंत गणवीर यांचे जन्म झाले. कुटुंबाची स्थिती अत्यंत बेताची होती. अवघ्या छोट्याश्या खोलीत कुटुंबाचा उदरनिर्वाह आहे त्यावर भागवून जीवन प्रवास इंजि. गणवीर यांचा सुरु झाला. वर्ग दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी अनवानी पायाने केले. एकच गणवेश आणि वस्तीगृहात राहून त्यांनी शिक्षण घेतले. कमवा आणि शिका या मुलमंत्रातून त्यानी अभियांत्रिकी अभ्यासक्रमात पदवीरपर्यंतचे शिक्षण घेतले. कितीही अडचणी आल्पातरी यशवंत गणवीर यांनी संघर्ष करीत जिद्द उराशी बाळगून संधीचे सोने केले. मेहनतीने आणि कष्टाने शिक्षण पूर्ण करुन आज ते कसलेही समाजकारण आणि राजकारनाचा वसा नसतानाही जि.प. उपाध्यक्ष म्हणून सेवा करीत आहेत. सन २००० ते २००५ या कालावधीत प्रतापगड ग्रामपंचायतीने सरपंच पद भूषविले. दरम्यान तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी जनप्रतिनिधींना पाठपुरावा करुन तिर्थक्षेत्राला श्रेणी दर्जा मिळवून दिला. शिवाय आदिवासी सेवा सहकारी संस्थेच्या उपाध्यक्षपदावर काम करण्याची संधी मिळाली. या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांना तसेच क्षेत्रातील बज़ीराजाच्या समस्या सोडविण्यात सदैव अग्रेसर राहिले.

## प्रेरणादायी वसा



सामाजिक कार्यातून लोकांची प्रश्ने कशी मार्गी लावावी ही कला अवगत असल्याने राष्ट्रवादीचे राष्ट्रीय नेते खा. प्रफुल पटेल तसेच माजी आ.राजेंद्र जैन यांनी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव येथून त्यांना जिल्हा परिषदेची संधी दिली. विजयी झाल्यानंतर नेत्यांनी वत किंचीतही विचार न करता जिल्हा परिषदेच्या आरोग्य व शिक्षण विभागाची जबाबदारी त्यांच्या खांद्याला दिली. या जबाबदारीला सार्थ ठरविण्यासाठी इंजि. यशवंत गणवीर यांनी खा. प्रफुल पटेल तसेच राजेंद्र जैन तसेच पक्षातील इतर पुढाऱ्यांना हाताशी धरुन व त्यांच्या मार्गदर्शनात कोलमडलेल्या आरोग्य व्यवस्थेला रुडावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शिवाय जि.प.च्या शाळा टिकून राहावे व शिक्षणाचा दर्जा उंचवावा यासाठी त्यांनी प्रयत्न आज दिसून येत आहे. एकंदरीत आरोग्य व शिक्षण या दोन क्षेत्रांना महत्व देत त्यांनी सुरु केलेला सामाजिक वसा आज इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## प्रेरणास्थान

समाज कारणानंतर राजकारणात सक्रिय होत असतांना सन २००२ मध्ये खा. प्रफुल पटेल, माजी आ.राजेंद्र जैन यांच्या नेतृत्वात इंजि. यशवंत गणवीर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्यता स्विकारली. पक्षाने तथा प्रेरणास्थानी असलेले खा. प्रफुल पटेल आणि राजेंद्र जैन यांनी जेव्हा-जेव्हा जबाबदारी दिली. तेव्हा-तेव्हा त्या जबाबदारीवर खरे उतण्यातही त्यांनी कसलीही कसर सोडली नाही. त्यामुळेच दोन्ही पक्ष श्रेष्ठी आजही त्यांच्या प्रेरणास्थानी आहेत.



## उल्लेखनीय कार्य

✦मागील १२ वर्षापासून प्रलंबित असलेले शिक्षकांची पदोन्नतीचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार, शिक्षकांना केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, उच्चश्रेणी मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळवून दिली. तसेच शिक्षकांच्या स्थानांतरणात पुढाकार घेऊन पारदर्शकपणे प्रक्रिया पार पाडली. ✦शाळेतील पहिल्या तासिकेला संविधानाच्या कलमांचे वाचन करण्याचा क्रांतीकारी निर्णय घेवून सर्वच शाळांमध्ये लागू केले. ✦१५ वा वित्त आयोग अंतर्गत कोलमडलेल्या शिक्षण व्यवस्थेला पुनरुजीवित करुन घेण्यासाठी शिक्षण स्वयंसेवकांची नियुक्ती केली. ✦सन २०२२-२३-२१०, सन २०२३-२४-२२० ✦हायस्कूल इमारत बांधकाम १२.३३ कोटी, समग्र शिक्षा अंतर्गत दुरुस्तीची कामे ६.६५ कोटी-आदर्श शाळांसाठी ३ कोटी

### पाणी पुरवठा विभाग

✦जलजीवन मिशन अंतर्गत-(पाणी टाकी, पाईपलाईन, दुहेरी हातपंप) १४.२८ कोटीची कामे

✦नक्षलग्रस्त भागाचा विकास कार्यक्रम अंतर्गत ४५ लाखाची कामे

✦लघू पाटबंधारे विभाग बंधारे व त्या अंतर्गत १.०५ कोटींच्या निधीतून तलाव दुरुस्ती.

## जिल्हा विकासाचा ध्यास...

✦नवीन पीएचसी इमारत बांधकाम-७.५० कोटी

✦उपकेंद्र इमारत बांधकाम-१४.६५ कोटी

✦७ नवीन पीएचसीचे व २३ उपकेंद्राचे लोकार्पण

✦मागील ४ वर्षापासून तयार होऊन धुळखात असलेल्या नवीन इमारतीचे तांत्रिक अडचणी दुर करुन लोकार्पण

✦शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व दर्जेदार शिक्षणासाठी जिल्ह्यातील शाळांना भेट देवून शिक्षकांना मार्गदर्शन व दिशानिर्देश

✦आदिवासी बहूल नक्षलग्रस्त जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या मुरकुटडोह येथील बंद पडलेली शाळा २०२३-२४ च्या सत्रात सुरु केली.

## जिल्हा परिषद क्षेत्र गोठणगाव

### आरोग्य विभाग-कामे

✦प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र येथील दुरुस्तीची कामे-७० लाख

✦नवीन उपकेंद्र इमारत बांधकाम-५५ लाख

### शिक्षण विभाग

✦प्राथमिक शाळांमध्ये वर्गखोली व शाळा दुरुस्ती, स्वच्छतागृह बांधकाम-३.१५ कोटी

### बांधकाम विभाग

✦५०/५४-आदिवासी क्षेत्रात-४५ लाख

✦३०/५४-आदिवासी क्षेत्रात-८० लाख

✦३०/५४-गैरआदिवासी क्षेत्रात-१.५० कोटीची कामे

✦जिल्हा निधी अंतर्गत २४ लाखाची कामे

✦तिर्थक्षेत्रविकास-७५ लाखाची कामे

✦प्रादेशिक पर्यटन विकास-२.३५ कोटीची कामे

✦१५ वा वित्त आयोग जिल्हास्तर ८५ लाखाची कामे

✦दलित वस्ती व नवबौद्ध घटकांचा विकास कार्यक्रम अंतर्गत ६५ लाख रुपये

✦ठक्कर बाप्पा आदिवासी सुधार योजनेंतर्गत ६० लाख रुपये

✦वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना अंतर्गत ७५ लाख रुपये

✦जनसुविधा अंतर्गत विविध विकास कामासाठी ४० लाख रुपये

✦नागरी सुविधा अंतर्गत विविध विकास कमांसाठी ३५ लाख रुपये

✦स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ४५ लाख रुपयांची विकास कामे

✦पशुवैद्यकीय दवाखाना दुरुस्तीसाठी २७ लाख रुपये









